# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.09.2025** **वार-गुरुवार**

---

**निर्मला सीतारामन**

देशाच्या आर्थिक विकासात आर्थिक संस्थांचा महत्त्वाचा वाटा आहे, असं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज पुण्यात केलं. बँक ऑफ महाराष्ट्रच्या 91 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. तंत्रज्ञानाद्वारे बँकिंग सेवा सुधारणं आणि नवकल्पनांना महत्त्व देणं गरजेचं असल्याचं सीतारामन म्हणाल्या. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी लघु उद्योगांसाठी युवकांना कर्ज आणि इतर सेवा द्याव्यात, असंही त्यांनी सुचवलं. सीतारामन यांनी बँक ऑफ महाराष्ट्रच्या नवीन औद्योगिक कार्यालयाचं उद्घाटन आणि झेन लाईफ मोबाईल बँकिंग ॲपचं लोकार्पणही केलं.

**पूरग्रस्तांना आरोग्यसेवा**

राज्यात मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. या संदर्भात पुण्यातल्या आरोग्य भवनात राज्यस्तरीय बैठक घेण्यात आली. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहे. आरोग्य केंद्रात पुरेसा औषध साठा उपलब्ध ठेवावा, आपत्कालीन स्थितीमध्ये रुग्णवाहिका सज्ज असावी, अश्या सूचना त्यांनी दिल्या.

मुसळधार पावसामुळे आणि जायकवाडी, माजलगाव, सिंधफणा धरणातून गेल्या पाच दिवसांपासून सोडण्यात आलेल्या पाणलोटामुळे मोठे  संकट उद्भवले आहेत. या संकटाला तातडीनं प्रतिसाद देत भारतीय लष्कराच्या दक्षिण मुख्यालयांनं धाराशिव, परभणी, बीड आणि सोलापूर जिल्ह्यामध्ये पूरग्रस्तांसाठी मोहीमा राबवल्या आहेत. हवाई बचाव मोहिमेद्वारे तातडीची मदत पोहोचवण्यात आली असून या सर्व मोहिमा स्थानिक प्रशासनाच्या सहकार्यानं पार पडल्या.

**PIC**

पुणे इंटरनॅशनल सेंटर अर्थात PIC चा 14 वा वर्धापन दिन पाषाण इथल्या नवीन परिसरामध्ये साजरा करण्यात आला. या वेळी संशोधक, राजकारणी आणि सनदी अधिकारी उपस्थित होते.  PIC च्या यशाचा आढावा यावेळी घेण्यात आला. तसंच PIC 2.0 च्या भविष्यातील भूमिकेवर चर्चा करण्यात आली. PIC चे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी संस्थेच्या प्रवासावर प्रकाश टाकला. पुणे हे जागतिक क्षमतेचं केंद्र असल्याचं ते म्हणाले. भारताची खरी ताकद म्हणजे त्याचं बौद्धिक भांडवल आहे, असंही ते म्हणाले. PIC ची पाच मार्गदर्शक तत्त्वे - स्वातंत्र्य, प्रामाणिकपणा, एकत्रिकरण, नावीन्य आणि प्रभाव- यावर त्यांनी प्रकाश टाकला.

**स्वच्छ सर्वेक्षण**

पिंपरी चिंचवड महापालिकेनं स्वच्छ सर्वेक्षण 2024-25 मध्ये देशात 7 वा आणि राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. महापालिकेकडून राबवण्यात आलेली स्वच्छता मोहीम, कचरा विलगीकरण, रिड्यूस-रियुज-रिसायकल आणि शून्य कचरा अशा विविध प्रकल्पांमुळे शहराच्या सार्वजनिक स्वच्छतेत मोठा बदल घडून आला आहे.

**व्हिजन@50 शहर धोरण उपक्रम**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थापनेस 2032 मध्ये 50 वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्तानं 'व्हिजन@50 शहर धोरण' हा उपक्रम महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी हाती घेतला आहे. या उपक्रमाच्या अंतर्गत शिक्षण विभागासाठी पुढील 5 वर्षांचा धोरणात्मक आराखडा तयार करण्याचं उद्दिष्ट ठेवून एका कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यशाळेमध्ये महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी ही सहभागी झाले होते.

**पुणे पेन प्रदर्शन**

'द पुणे फाऊन्टन पेन शो 2025; या प्रदर्शनात 13हून अधिक देशांतल्या 55 पेक्षा अधिक नामवंत कंपन्यांची 10 हजारांहून अधिक पेनं पाहण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. पुण्यातल्या 'वन प्लेस' इथं उद्यापासून ते 28 सप्टेंबर पर्यंत हे प्रदर्शन होणार आहे. प्रदर्शनाचं उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश दिलीप कर्णिक यांच्या हस्ते होईल. अशी माहिती द इंक अँड पेन्सच्या संचालिका रश्मी नगरकर-पिल्ले यांनी दिली.

**जयमाला शिलेदार**

संगीत रंगभूमीवरील प्रसिद्ध गायिका आणि अभिनेत्री पद्मश्री जयमाला शिलेदार यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 8 आणि 9 नोव्हेंबर 2025 रोजी पुण्यातल्या निळू फुले कला अकादमी इथं खुली संगीत नाट्यप्रवेश स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. संगीत रंगभूमीचा गौरव करण्यासाठी एकपात्री कलाकार परिषद, महाराष्ट्र, कलांगण अकादमी, पुणे आणि निळू फुले कला अकादमी यांनी संयुक्तरीत्या या स्पर्धेचं आयोजन केलं आहे. मराठी भाषेतील साहित्य, संगीत, नाट्य नवीन पिढीपर्यंत पोहोचावं यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दुपार नंतर काही भागात पावसाच्या सरी बरसल्या. उद्या आकाश ढगाळ राहून हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागान वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**